**स्पे. दि. दावा क्र. ३२/२००७ मधील नि. क्र. ११९ खालील आदेश**

CNR : MHSN05-001445-2007

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ ने त्यांच्याविरुद्ध झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ७ चे म्हणणे असे की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी व उदयसिंह देशमुख वगैरे लोकांच्याविरुद्ध खरेदीपत्राबाबत दाखल केला आहे. यातील उदयसिंह हा प्रतिवादी क्र. ७ चा सख्खा भाऊ आहे. उदयसिंह हा गुंड प्रवृत्तीचा माणूस असून त्याने प्रतिवादी क्र. ७ ला अनेक वर्षे दहशतीखाली ठेवले आहे. शिवाय मिळकतीच्या वहिवाटीवरुन इस्लामपूरच्या न्यायालयात फौजदारी केस क्र. १८६/२००७ आणि पलूस न्यायालयात केस क्र. २७/२०१० प्रलंबीत आहेत. उदयसिंहच्या दहशतीमुळे व त्याने प्रस्तुतची केस मिटवून देतो, असे सांगितल्यामुळे प्रतिवादी न्यायालयात हजर राहिले नाहीत व त्यांनी कैफियत दिली नाही. शिवाय प्रतिवादीला अनेक वर्षापासून हृदयविकाराचा त्रास आहे. त्यामुळे तो न्यायालयात हजर राहून कैफियत देवू शकला नाही. प्रतिवादी कैफियत देवू इच्छितो. त्याला संधी मिळणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. वादींनी अर्जास विरोध करुन त्यांचे म्हणणे निशाणी १२२ वर दिले आहे. वादींनी प्रतिवादी क्र. ७ ने उदयसिंहविरुद्ध केलेल्या तक्रारी मान्य केल्या आहेत. तसेच इस्लामपूर व पलूसच्या न्यायालयामध्ये दाखल असलेल्या फौजदारी केसेसबाबतचा मजकूरही मान्य केला आहे. पुढे वादींचे म्हणणे असे की, अर्जाच्या परिच्छेद क्र. २ मधील मजकूर चुकीचा आहे. तो वादींना मान्य नाही. त्यामुळे अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब तो रद्द करावा. यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास रुपये ३,०००/– खर्च देण्याचा आदेश व्हावा.

४.		दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहिला. अभिलेखावरुन व वादींनी दिलेल्या म्हणण्यावरुन, वादी, प्रतिवादींच्या दरम्यान २००७ पासून या दाव्याप्रमाणेच फौजदारी प्रकरणे प्रलंबीत आहेत असे दिसते. शिवाय प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले कैफियत देण्यास उशिर झाल्याबद्दलचे कारण वादींनी नाकारलेले नाही. त्यामुळे केवळ प्रतिवादीने कैफियत देण्यास विलंब केला म्हणून त्याला संधी नाकारता येणार नाही. दाव्याचे स्वरुप पहाता प्रतिवादी क्र. ७ ला संधी देणे आवश्यक आहे. सदरची संधी योग्य तो खर्चाचा आदेश करुन दिल्यास दाव्याच्या गुणदोषावर निकालास मदत होणार आहे. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

प्रतिवादी क्र. ७ ने रुपये १,०००/– (रुपये एक हजार मात्र) खर्च पुढील तारखेच्या आत द्यावा, या अटीवर त्यांच्याविरुद्ध झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

खर्चाची रक्कम विधी सेवा समिती वाळवा–इस्लामपूर यांच्याकडे जमा करण्याची आहे.

प्रतिवादीने वरीलप्रमाणे वेळेत खर्चाची रक्कम भरली नाही तर वरील आदेश आपोआप रद्द समजण्याचा आहे.

सही/–

इस्लामपूर.		(श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक–०३.१२.२०१८		दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर